Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
**दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,**
**www.unishivaji.ac.in**

# विद्यार्थी विकास विभाग

**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/255    दि. ०४/०१/२०२५

6. JAN 2025

प्रती,
**मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,**
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– शिवस्पंदन सांस्कृतिक स्पर्धा २०२४ – २०२५ बाबत.**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ मधील शिवस्पंदन सांस्कृतिक स्पर्धाचे आयोजन माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवडयात करण्याचे प्रस्तावित आहे. या सांस्कृतिक स्पर्धा पुढील कलाप्रकारामध्ये घेण्यात येणार आहेत. सोबत स्पर्धेची नियमावली जोडली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. लोकवाद्यवादन | २. समुहगीत | ३. सुगम गायन | ४. समुह नृत्य |
| ५. मुकनाटय | ६. एकल नृत्य | ७. नकला | ८. लघुनाटीका |
| ९. रांगोळी | १०. स्थळ चित्र | ११. शोभायात्रा (रॅली) | |

सदरची स्पर्धा हि विद्यापीठातील अधिविभागामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आहे. उपरोक्त स्पर्धा मधून १ ते ५ क्रमांक काढण्यात येणार आहे. बक्षिस पात्र विद्यार्थ्यांना मोमेंन्टो, मेडल व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये सर्वात जास्त बक्षिसे मिळविणाऱ्या अधिविभागास फिरता सर्वसाधारण विजेते पद चषक देण्यात येणार आहे.

**सदर स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या अधिविभागास खर्चासाठी रु. ५,०००/– इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.**

या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी आपल्या अधिविभागाकडील लॉगिंग व पासवर्ड मधून नोंदणी करणे आवश्यक आहे. सदर लिंकद्वारा नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनाच स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी सोबत जोडलेल्या नियमावलीचे काटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. स्पर्धेचा नोंदणी फॉर्म लिंक व अंतिम तारीख नंतर कळविण्यात येईल.

तरी सदरचे परिपत्रक आपल्या अधिविभागातील नोटिस बोर्डवर विद्यार्थ्यांच्या निर्दशानास येईल अशा प्रकारे लावण्यात यावे व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे, हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू
I/c 06-01-2025
संचालक
विद्यार्थी विकास विभाग